मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मालमत्ता कर वसुलीसाठी सुट्टीतही कार्यालये सुरु

## गुढीपाडवा व रामनवमीला मालमत्ता कर भरण्यासाठी कार्यालिय राहणार खुले

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत शहरात मालमत्ता कर वसुलीची मोहीम सुरू असून नागरिकांना अधिक सोयीस्कर पद्धतीने कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. चालू आर्थिक वर्षातील उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आता अवघे १५ दिवस शिल्लक राहिले असून या पार्श्वभूमीवर कर वसुलीला गती देण्यात येत आहे. नागरिकांना कर भरण्यास अधिक सुविधा मिळाव्यात यासाठी महापालिकेचे मुख्य कार्यालय तसेच शहरातील १८ विभागीय कर संकलन कार्यालये शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात येणार आहेत. त्यामुळे नागरिकांना सुट्टीच्या दिवशीही मालमत्ता कर भरण्याची सोय उपलब्ध होणार आहे.

या महिन्यात दि.१९ मार्च रोजी गुढीपाडवा तसेच दि.२६ मार्च रोजी श्री राम नवमी या सार्वजनिक सुट्ट्या असून त्या दिवशीही सर्व विभागीय कर संकलन कार्यालये नागरिकांसाठी खुली ठेवण्यात येणार आहेत. या कालावधीत सर्व कार्यालयांतील कॅश काऊंटर सकाळी ९.४५ ते सायंकाळी ५.४५ या वेळेत सुरू राहणार आहेत. यामुळे कामकाजाच्या दिवशी वेळ काढणे शक्य नसलेल्या नागरिकांनाही सुट्टीच्या दिवशी मालमत्ता कर भरण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे.

पिंपरी चिंचवड शहरातील मालमत्ताधारकांसाठी मालमत्ता कर भरण्यासाठी १८ विभागीय कर संकलन कार्यालये कार्यान्वित असून या कार्यालयांमध्ये प्रत्यक्ष कर भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्याचबरोबर नागरिकांच्या सोयीसाठी ऑनलाईन पद्धतीनेही मालमत्ता कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी कार्यालयात येऊन किंवा महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन ऑनलाईन माध्यमातून सहजपणे कर भरू शकतात.




### अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी अवघे १५ दिवस शिल्लक

» पिंपरी चिंचवड महापालिकेमार्फत राबविण्यात येत असलेल्या अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी अवघे १५ दिवस शिल्लक राहिले आहेत. या योजनेअंतर्गत थकीत मालमत्ता कर एकरक्कमी भरल्यास विलंब दंडावर तब्बल ९० टक्के सवलत दिली जात आहे. आतापर्यंत ५ लाखांहून अधिक मालमत्ताधारकांनी ८०६ कोटी ७८ लाखांचा भरणा केला आहे. महापालिकेच्या अभय योजनेला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून दि. १ मार्चपासून १४ मार्चपर्यंत १७ हजारांहून अधिक मालमत्ताधारकांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. तसेच अभय योजना लागू झाल्यापासून आतापर्यंत ५१ कोटी ११ लाख रुपयांचा मालमत्ता कर भरणा  झाला आहे. यात थकबाकीदारांना १३ कोटींची सवलत देण्यात आली आहे.

> नागरिकांना मालमत्ता कर भरण्यासाठी अधिक सोयी उपलब्ध करून देणे ही महापालिकेची प्राथमिकता आहे. त्यानुसार साप्ताहिक तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही कर संकलन कार्यालये सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गुढीपाडवा व श्रीराम नवमीच्या दिवशीही नागरिकांना कर भरण्याची सुविधा उपलब्ध असणार आहे. नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेऊन आपला मालमत्ता कर वेळेत भरून महापालिकेला सहकार्य करावे.
>
> - रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महापालिका

> चालू आर्थिक वर्षाच्या अखेरीस मालमत्ता कर वसुलीला गती देण्यासाठी कर संकलन विभागामार्फत विशेष नियोजन करण्यात आले आहे. नागरिकांना कर भरण्यासाठी अधिक वेळ व सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी विभागीय कर संकलन कार्यालये शनिवार, रविवार तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात येणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी कार्यालयात येऊन किंवा ऑनलाईन माध्यमातून आपला थकीत तसेच चालू वर्षाचा मालमत्ता कर लवकरात लवकर भरावा.
>
> - डॉ.विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

# पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात 31 मार्चपर्यंत कलम 37 (1) व (3) आदेश जारी

## कलम 37 अन्वये शस्त्रे, मिरवणुका व सभा यांवर निर्बंध; अभय योजनेसाठी शेवटचे 15 दिवस

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात शांतता व सुव्यवस्था राखणेकामी पोलीस सह आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, यांनी प्राप्त अधिकाराचा वापर करुन व महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन 1951 चे कलम 37 (1) व (3) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात 18 मार्च 2026 रोजी पासून ते 31 मार्च 2026 रोजीपर्यंत खाली नमूद केलेली कृत्य करण्यास या आदेशान्वये मनाई करीत आहे.

कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ द्रव्य बरोबर नेणे. दगड अथवा शस्त्रे किवा अस्खे सोडावयाची अस्त्रे किंवा फेकावयाची हत्यारे अगर साधने बरोबर नेणे.0शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, दंड, काठ्या, बंदुका व शारिरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे. कोणत्याही इसमाचे




चित्राचे प्रतिकात्मक प्रेताचे किंवा पुढा-यांचे चित्राचे प्रतिमेचे प्रदर्शन व दहन करणे. मोठ्याने अर्वाच्य घोषणा देणे, वाद्य वाजविणे. ज्यामुळे सभ्यता अगर नितिमत्ता यास धोका पोहचेल किवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा राज्य उलथवून देण्यास प्रवृत्त करेल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे किवा अविर्भाव करणे कोणतेही जिन्नस तयार करुन त्याचा जनतेत प्रसार करणे.  ज्या योगे वरील परिसरात कायदा व सुव्यवस्था धोक्यात येईल अशा पध्दतीने कलम 37(1) व (3) विरुध्द वर्तन करणे. कलम 37 चे पोटकलम (3) अन्वये पाच पेक्षा जास्त लोकांचा जमाव करणे, तसेच पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे पुर्व परवानगी शिवाय सभा घेणे किंवा मिरवणुका काढणेस बंदी घालण्यात येत आहे.

वरील संपूर्ण आदेश हा शासनाच्या सेवेतील व्यक्तींना व ज्यांना आपल्या वरीष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्यपुर्तीसाठी हत्यार वाळगणे आवश्यक आहे व त्याबबात परवानगी आहे त्यांना लागू होणार नाही. या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधित व्यक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन 1951 चे कलम 135 प्रमाणे शिक्षेस पात्र होईल.

# महापालिकेच्या वतीने उत्कृष्ट महिला बचत गटांचा सन्मान

## महिला दिनानिमित्त कार्यक्रम, सक्षमीकरणाचा संदेश; सुविधांसाठी नवे उपक्रम जाहीर

**पिंपरी | प्रतिनिधी**

महिलांचे योगदान समाजासाठी खूप मोठे आहे. एक महिला स्वतः सक्षम झाल्यानंतर ती तिच्या संपूर्ण कुटुंबाला सक्षम करीत असते. त्यामुळे आज प्रत्येक महिला सक्षम व्हावी, यासाठी विविध उपक्रम राबवणे गरजेचे असून त्यासाठी महापालिकेचा समाज विकास विभाग सक्षमपणे कामकाज करीत आहे असे प्रतिपादन उपमहापौर शर्मिला बाबर यांनी केले. जागतिक महिला दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाच्या वतीने चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमाचे उद्घाटन उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या हस्ते आणि माजी आमदार अश्विनी जगताप, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती राणी पठारे, डॉ.श्रद्धा रवि लांडगे, प्रिया आण्णा बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले त्यावेळी त्या बोलत होत्या.

या कार्यक्रमास नगरसदस्या माई काटे,नीता पाडाळे, कुंदा भिसे,अनिता काटे, प्रतीक्षा लांघी जवळकर, पल्लवी जगताप, रेश्मा भुजबळ, सुलभा उबाळे, सुप्रिया चांदगुडे, रिटा सानप, सारिका बोऱ्हाडे, शिवानी नरळे, प्रियांका कुदळे, योगिता बारणे, निकिता कदम, सारिका मासुळकर, सोनम मोरे, मनीषा लांडे, पल्लवी वाळके, श्रुती वाकडकर, वर्षा जगताप, निकिता कदम, पल्लवी वाल्हेकर, कुंदा भिसे, श्रुती डोळस, वैशाली काळभोर,माजी नगरसदस्या उषा मुंढे,उपायुक्त ममता शिंदे, चेतना केरूरे, सहाय्यक आयुक्त निवेदिता घार्गे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागात काम करणाऱ्या महिला अधिकारी, कर्मचारी, महिला बचत गटातील महिला मोठ्या उपस्थित होत्या.

माजी आमदार आश्विनी जगताप म्हणाल्या की, महिलांचा विकास झाला तरच समाजाचा विकास शक्य होईल. प्रत्येक महिलेने स्वतःच्या पायावर उभे राहून सक्षम व्हावे, असे सांगतानाच 'निरोगी रहा, आनंदी रहा, हसत रहा,' असा मोलाचा सल्लाही त्यांनी यावेळी उपस्थित महिलांना दिला. महिला दिनाचे औचित्य साधत शहरातील बसस्थानके, बाजारपेठा, मंडई, मार्केट तसेच गर्दीच्या ठिकाणी महिला आणि दिव्यांगांसाठी सर्व सुविधायुक्त आधुनिक स्वच्छतागृहे उभारण्याचे नियोजन करण्यात येणार असल्याची माहिती महिला व बालकल्याण समितीच्या सभापती राणी पठारे यांनी केली. शहरातील महिलांना स्वतंत्र स्वच्छतागृह नसल्यामुळे त्यांची होणारी गैरसोय आणि आरोग्यावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेऊन हा उपक्रम लवकरच राबविण्यात येणार आहे. यामुळे महिलांसाठी स्वतंत्र आधुनिक स्वच्छतागृहे उभारणारी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका राज्यातील पहिली महानगरपालिका ठरणार आहे असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त ममता शिंदे यांनी केले तसेच संगणकीय सादरीकरणातून समाज विकास विभागामार्फत राबविण्यात येणा-या उपक्रमांची माहितीही दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले तर आभार समाज विकास अधिकारी संतोषी चोरगे यांनी मानले.



### सन्मान झालेले बचतगट

» अस्तित्व महिला बचत गट,श्री तुळजाभवानी महिला बचत गकृष्णा महिला बचत गट,रायगड महिला बचत गटराजमाता महिला बचत गट,आराध्या महिला बचत गट,दत्तकृपा महिला बचत गट,मैत्री दिव्यांग महिला बचत गट,क्रांतीज्योती महिला बचत गट,विजयालक्ष्मी महिला बचत गटसमिता महिला बचत गट,दिव्यज्योती महिला बचत गट,मेरूशिखर महिला बचत गट.

### सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण..

» जागतिक महिला दिनाच्या या कार्यक्रमात शहरात विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिला बचत गटांचा यावेळी सन्मान देखील करण्यात आला. या कार्यक्रमात महिलांसाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच महापालिकेच्या महिला कर्मचाऱ्यांनी यावेळी गीतगायन तसेच विविध पारंपरिक नृत्यांचे सादरीकरण केले.

### सन्मान झालेले बचतगट फेडरेशन

» संजीवनी स्वयंरोजगार सहकारी संस्था मर्यादित, उड्डाण स्वयंरोजगार सहकारी संस्था मर्यादित , आरंभ स्वयंरोजगार महिला सहकारी संस्था मर्यादित ,झेप स्वयंरोजगार सहकारी संस्था मर्यादित ,एकता स्वयंरोजगार सहकारी संस्था मर्यादित ,गरुडझेप स्वयंरोजगार महिला सहकारी संस्था मर्यादित ,अल्फा स्वयंरोजगार सहकारी संस्था मर्यादित.

# पिंपरी-चिंचवडच्या पाणी नियोजनावर भर; आयुक्तांची भूमिका स्पष्ट

## पाणीटंचाईवर उपाययोजना सुरू; पवना व भामा-आसखेड प्रकल्पांना गती देणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या वाढ प्रचंड वेगाने होत आहे. दरवर्षी पाच टक्के लोकाची नव्याने भर पडत आहे. सध्यस्थितीत २० एमएलडी पाण्याची कमतरता भासत आहे. त्यामुळे भविष्यात शहरातील पाण्याचे योग्य नियोजन करावे लागणार आहे. याकरिता पवना बंदिस्त प्रकल्पासह भामा-आसखेड पाईपलाईन योजना लवकरात लवकर मार्गी लावण्याचा प्रयत्न असणार आहे. अशी माहिती आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आयुक्त पदाचा कार्यभार डॉ. विजय नामदेव सूर्यवंशी यांनी आज (सोमवारी) प्रभारी आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्याकडून स्वीकारला. यावेळी उपायुक्त आण्णा बोदडे, विशेष कार्यकारी अधिकारी किरण गायकवाड, प्रफूल्ल पुराणिक आदी उपस्थित होते.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सकाळपासून विभाग प्रमुखाकडून शहरातील विविध विकास प्रकल्प, नागरी सुविधा आणि महापालिकेच्या सुरू असलेल्या कामकाजाबाबत सविस्तर माहिती घेतली. तसेच शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सुरू असलेल्या विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांची गती कायम ठेवणे, नागरिकांना अधिक दर्जेदार सेवा उपलब्ध करून देणे तसेच प्रशासनाचे कामकाज अधिक प्रभावी आणि गतिमान करण्याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली. तसेच नवीन आयुक्त म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर डॉ. सूर्यवंशी यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेत शहराच्या विकासासाठी प्रशासनाच्या माध्यमातून समन्वयाने आणि प्रभावीपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

सुर्यवंशी म्हणाले की, आतंरराष्ट्रीय स्तरावर शहर तयार करायचे असेल तर पर्यावरण संवर्धन करणे आवश्यक आहे. हवा व वायू प्रदूषण नियंत्रणावर अधिक काम करावे लागेल. शहरातील प्रत्येक नागरिकांना स्वच्छ हवा मिळावी, शहराचा एक्यूआय नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभावी काम करावे लागणार आहे.



### पाणीटंचाईवर उपाययोजना सुरू

» पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून सध्या सुमारे २० एमएलडी पाण्याची कमतरता भासत आहे. या पार्श्वभूमीवर नव्याने पदभार स्वीकारलेल्या आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पाणी व्यवस्थापनावर भर देण्याचे स्पष्ट केले. पवना बंदिस्त प्रकल्प आणि भामा-आसखेड पाईपलाईन योजना लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. तसेच करसंकलन वाढवणे, पर्यावरण संवर्धन, ड्रेनेज सुधारणा आणि क्रीडा व शिक्षण क्षेत्रातही सुधारणा करण्यावर प्रशासनाचा भर राहणार आहे.

# अभय योजनेतून महापालिका 'मालामाल'!

## अभय योजनेचा 1.64 लाख नागरिकांनी घेतला लाभ; व्याजात 75% सवलत देऊनही 78 टक्के थकबाकी

**पुणे | प्रतिनिधी**

मिळकतकर थकबाकीचा डोंगर कमी करण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून १५ नोव्हेंबर ते १५ मार्च या कालावधीत राबविण्यात आलेल्या अभय योजनेत महापालिकेस तब्बल ९५४ कोटी ७८ लाखांचे उत्पन्न मिळाले आहे. महापालिकेकडून या योजने अंतर्गत निवासी तसेच व्यावसायिक मिळकतींना मिळकतकराच्या थकबाकीवर आकारण्यात आलेल्या व्याजावर ७५ टक्के सवलत देण्यात आली होती.

या सवलतीचा लाभ १ लाख ६४ हजार ६६५ मिळकतधारकांनी घेतला आहे. त्यामुळे, महापालिकेच्या तिजोरीत थकबाकीची पहिल्यांदाच विक्रमी वसुली झाली आहे. महापालिकेच्या मिळकतकर विभागाची थकबाकी सुमारे १३ हजार कोटी असून, ती वसूल न झाल्याने त्यावर दरवर्षी चक्रवाढ व्याजानुसार २४ टक्के दंड आकारला जातो.

त्यामुळे हा डोंगर वाढतच आहे. तर अभय योजनेसह, नियमित वसुलीतून महापालिकेच्या तिजोरीत आतापर्यंत २८०० कोटींचे उत्पन्न जमा झाले आहे. त्यात, २०२५-२६ या आर्थिक वर्षातील सुमारे १८५० कोटी रुपयांच्या वसुलीचाही समावेश आहे.




### अभय योजनेला प्रतिसाद

» महापालिकेच्या अभय योजनेला नागरिकांकडून मध्यम प्रतिसाद मिळाला. १५ नोव्हेंबर ते १५ मार्च या कालावधीत सुमारे १ लाख ६४ हजार ६६५ मिळकतधारकांनी योजनेचा लाभ घेतला. ७५ टक्के व्याज सवलतीमुळे थकबाकी भरण्यास प्रोत्साहन मिळाले. मात्र, अपेक्षेप्रमाणे मोठ्या प्रमाणात नागरिक पुढे आले नाहीत. प्रशासनाने सुमारे ४ लाखांहून अधिक मिळकतधारकांकडून प्रतिसाद अपेक्षित धरला होता. तरीही मिळालेला प्रतिसाद महापालिकेसाठी महत्त्वाचा ठरला असून वसुली वाढण्यास मदत झाली.

महापालिका प्रशासनाकडून या पूर्वी पाच वेळा अभय योजना राबविण्यात आली आहे. मात्र, या योजनांमध्ये केवळ निवासी मिळकती तसेच ५० लाखांच्या आत मिळकतकर असलेल्या करधारकांनाच सवलत देण्यात आली होती. मात्र, यावेळी अभय योजनेत कोणतीही अट ठेवण्यात आलेली नव्हती. त्यामुळे, प्रशासनाला सुमारे ४ लाख ९७ हजार मिळकतधारकांकडून जवळपास ५ हजार ५०० कोटी रुपयांची थकबाकी वसूल होईल, अशी अपेक्षा होती.

मात्र, केवळ १ लाख ६४ हजार ६६५ मिळकतधारकांनीच या योजनेचा लाभ घेतला असून महापालिकेने निश्चित केलेल्या आकड्यापेक्षा अवघी २१ ते २२ टक्केच थकबाकी वसूल झाली आहे. तर, हे उत्पन्न मिळविण्यासाठी प्रशासनासनाने मागील चार महिन्यांत दोन वेळा या योजनेस मुदतवाढ दिलेली आहे.

महापालिका प्रशासनाकडून थकबाकी भरण्यासाठी कर सवलत देऊनही अनेक मिळकतधारकांनी त्याकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे आता प्रशासनाकडून थकबाकीदारांवर कडक कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ३१ मार्च ही कर भरण्याची अंतिम तारीख असल्याने नियमित वसुलीसह थकबाकीदारांच्या मिळकती सील करण्याची कारवाई अधिक तीव्र केली जाणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### 954 कोटींची विक्रमी वसुली

» अभय योजनेमुळे महापालिकेच्या तिजोरीत तब्बल ९५४ कोटी ७८ लाख रुपयांची भर पडली आहे. ही थकबाकी वसुलीची आतापर्यंतची सर्वाधिक नोंद मानली जात आहे. यासोबतच नियमित वसुलीतून एकूण २८०० कोटी रुपये जमा झाले आहेत. त्यात २०२५-२६ आर्थिक वर्षातील १८५० कोटींचाही समावेश आहे. तरीही एकूण थकबाकी १३ हजार कोटींच्या घरात असल्याने प्रशासनासमोर मोठे आव्हान कायम आहे.

### थकबाकीदारांवर कडक कारवाई

» अभय योजनेला मुदतवाढ देऊनही अनेक मिळकतधारकांनी थकबाकीकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे आता महापालिका प्रशासनाने कडक भूमिका घेतली आहे. ३१ मार्च ही अंतिम मुदत लक्षात घेऊन थकबाकीदारांच्या मिळकती सील करण्याची कारवाई तीव्र केली जाणार आहे. तसेच कर न भरल्यास दंडात्मक उपाययोजना राबवण्यात येणार आहेत. प्रशासनाने नागरिकांना वेळेत कर भरण्याचे आवाहन केले असून अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशाराही दिला

# शहरात अनधिकृत होर्डिंगबाजांवर महापालिकेचा 'सर्जिकल स्ट्राईक'

## चार दिवसांमध्ये फ्लेक्स बोर्ड बॅनर पहाड झेंडे असे सर्व मिळून 2600 इतक्या संख्येने निष्कर्षित करण्यात आले

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरांमध्ये गेले चार दिवसांमध्ये फ्लेक्स बोर्ड बॅनर पहाड झेंडे असे सर्व मिळून जवळपास २६०० इतक्या संख्येने निष्कर्षित करण्यात आलेले आहेत. शहरात पुन्हा बोर्ड बॅनर लागणार नाहीत याकरिता रात्रपाळीमध्ये पथकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे. ज्या ठिकाणी असे फलक लावण्यात येतील त्यांचेवर गुन्हा नोंदवण्याची कारवाई महापालिकेमार्फत करण्यात येणार आहे त्याचबरोबर पोलिसांमार्फत देखील गस्तीपथक नियुक्त करण्यात आलेले आहे.

आज पर्यंत शहरातील गेल्या चार दिवसात 25 होर्डिंग अनधिकृत होर्डिंग निष्कषित करण्यात आलेले आहेत. त्यांचे कडून प्रति होर्डिंग दोन लाख इतका दंड वसूल करण्यात येणार आहे. दंड न भरल्यास करामधून शास्तीसह रक्कम वसूल केली जाणार आहे.



शहरातील अनधिकृत होर्डिंगवर बुधवार दिनांक 18 पासून कारवाई मोठ्या प्रमाणात सुरू करण्यात येणार असून प्रत्येक क्षत्रिय कार्यालय अनधिकृत होर्डिंग निर्मूलनासाठी पथक नियुक्त केलेले आहे. त्याप्रमाणे कार्यादेश जारी केला आहे कारवाईची तीव्रता वाढवणे बाबत महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सक्त आदेश दिलेले आहेत.

गेल्या चार दिवसांत सुमारे 2600 फलक हटवण्यात आले असून 25 होर्डिंगवर कारवाई करण्यात आली आहे. प्रति होर्डिंग 2 लाख रुपये दंड आकारला जाणार आहे. दंड न भरल्यास करातून वसुली केली जाईल. शहरात पुन्हा अनधिकृत फलक लागणार नाहीत यासाठी रात्रपाळी पथके व पोलिस गस्तीची व्यवस्था करण्यात आली आहे. 18 तारखेपासून कारवाई आणखी तीव्र करण्याचे आदेश आयुक्त नवल किशोर राम यांनी दिले आहेत.

### अनधिकृत होर्डिंगविरोधात धडक मोहीम

» पुणे शहरात अनधिकृत फ्लेक्स, बॅनर आणि होर्डिंगविरोधात महापालिकेने मोठी मोहीम सुरू केली आहे. गेल्या चार दिवसांत सुमारे 2600 फलक हटवण्यात आले असून 25 होर्डिंगवर कारवाई करण्यात आली आहे. प्रति होर्डिंग 2 लाख रुपये दंड आकारला जाणार आहे. दंड न भरल्यास करातून वसुली केली जाईल. शहरात पुन्हा अनधिकृत फलक लागणार नाहीत यासाठी रात्रपाळी पथके व पोलिस गस्तीची व्यवस्था करण्यात आली आहे. 18 तारखेपासून कारवाई आणखी तीव्र करण्याचे आदेश आयुक्त नवल किशोर राम यांनी दिले आहेत.

# पुणेकरांना मोठा दिलासा! 96 तासांत घरपोच मिळणार गॅस सिलिंडर

## पुणे शहरासह जिल्ह्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणारा निर्णय जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी घेतला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून पुणे शहरासह जिल्ह्यात गॅस सिलेंडर मिळवण्यासाठी नागरिकांनी रांगा लावल्याचे चित्र पाहायला मिळाले. त्यामुळे पुणेकरांना ऐन उन्हाळ्यात सिलेंडर मिळवण्यासाठी उन्हाचे चटके घ्यावे लागले.

घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या तथाकथित तुटवडीच्या अफवांमुळे ही गोष्ट घडली आहे. अशातच पुणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी जिल्ह्यातील सर्व तेल कंपन्या व गॅस एजन्सींच्या प्रतिनिधींना घरगुती गॅस सिलेंडर वितरणाबाबत महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत.

यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक पार पडली. या बैठकीत घरगुती गॅस सिलेंडरचे वितरण केवळ ओटीपी (OTP) प्रणालीद्वारेच करण्यात येणार असून गॅस बुकिंग केल्यानंतर 96 तासांच्या आत सिलेंडर घरपोच देणे बंधनकारक राहील, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले आहे.

पुणेकरांमध्ये गॅस सिलेंडर मिळण्याबाबत मोठा संभ्रम निर्माण झाला होता. गॅस सिलेंडरचा साठा अपुरा असल्याने गॅस सिलेंडर देण्यात अडचणी येत असून, आगामी काळात हे संकट अधिक गहिरे होईल अशी भीती होती. पुण्यात गॅस सिलेंडरची तुटवड्याची अफवा पसरल्यानंतर नागरिकांनी एजन्सीसमोर मोठ्या प्रमाणात गर्दी केली. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी तातडीने बैठक घेऊन वितरण प्रक्रियेत शिस्त आणण्याचे निर्देश दिले. मात्र, जिल्हाधिकाऱ्यांनी घेतलेल्या निर्णयामुळे पुणेकरांसह जिल्ह्यातील नागरिकांनाही मोठा दिलासा मिळाला आहे. तसेच गॅस एजन्सीसमोर गर्दी करू नये असा संदेश (SMS) पाठवावा, असेही सांगण्यात आले. गॅस सिलेंडर वितरण प्रक्रियेत कोणीही अडथळा निर्माण केल्यास संबंधितांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल, असे निर्देश पोलिस प्रशासनाला देण्यात आले आहेत.




### जिल्हाधिकाऱ्यांनी कोणत्या महत्वाच्या सूचना दिल्या

» गॅस सिलिंडर वितरणावेळी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी वेळोवेळी लक्ष ठेवावे.
» गॅस एजन्सी आणि गोदामांवर अनावश्यक गर्दी होऊ नये यासाठी संबंधित पोलिस स्टेशनने नियमित पाहणी करावी.
» गॅस एजन्सीकडून सिलिंडर वितरणासाठी पोलिस मदत मागितल्यास नियमानुसार मदत पुरवावी.
» गॅस सिलेंडर वितरणात अडथळा आणणे किंवा हस्तक्षेप झाल्यास संबंधितांवर तात्काळ कायदेशीर कारवाई करावी.

### पुणेकरांना मोठा दिलासा

» पुणेकरांमध्ये गॅस सिलेंडर मिळण्याबाबत मोठा संभ्रम निर्माण झाला होता. गॅस सिलेंडरचा साठा अपुरा असल्याने गॅस सिलेंडर देण्यात अडचणी येत असून, आगामी काळात हे संकट अधिक गहिरे होईल अशी भीती होती. मात्र, जिल्हाधिकाऱ्यांनी घेतलेल्या निर्णयामुळे पुणेकरासंह जिल्ह्यातील नागरिकांनाही मोठा दिलासा मिळाला आहे.

### गॅस वितरणासाठी नवे नियम लागू

» पुण्यात गॅस सिलेंडरची तुटवड्याची अफवा पसरल्यानंतर नागरिकांनी एजन्सीसमोर मोठ्या प्रमाणात गर्दी केली. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी तातडीने बैठक घेऊन वितरण प्रक्रियेत शिस्त आणण्याचे निर्देश दिले. आता गॅस सिलेंडर केवळ ओटीपी प्रणालीद्वारेच दिले जाणार असून, बुकिंगनंतर 96 तासांच्या आत घरपोच वितरण बंधनकारक करण्यात आले आहे. गर्दी टाळण्यासाठी नागरिकांना एसएमएसद्वारे सूचना देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच वितरणात अडथळा आणणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

# समाविष्ट गावांच्या मिळकतकरासाठी समिती स्थापन

## समाविष्ट गावांतील करप्रश्नावर नागरिकांची नाराजी; महापालिकेकडून तोडग्यासाठी पुढाकार

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट करण्यात आलेल्या गावांमध्ये मिळकत कर मिळत नसल्याने महापालिकेचे उत्पन्न कमी होत आहे. या गावांमधून मिळकत कर वसूल करण्यासाठी राज्य सरकारने स्थिती दिली आहे. त्यामुळे महापालिकेला या गावांमधून कोणताही कर वसूल करता येत नाही. दरम्यान, मिळकत कराचा बोजा समाविष्ट गावातील नागरिकांवर वाढत असून त्यावर तोडगा काढावा, अशी मागणी येथील नागरिकांकडून केली जात आहे.

महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांमधील कर आकारणीचा निर्णय घेण्यासाठी या गावांतील सभासदांची समिती स्थापन करण्यात येईल. या समितीकडे सर्व संबंधितांनी आपल्या लेखी सूचना व मते सादर करावीत. त्यानंतर प्रशासनाशी चर्चा करून योग्य तो मार्ग काढण्यात येईल. तसेच, यामध्ये आवश्यकतेनुसार राज्य सरकारचे मार्गदर्शनदेखील घेतले जाईल, असे महापौर मंजूषा नागपुरे यांनी सांगितले.

महापालिकेत समाविष्ट करण्यात आलेल्या हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमधील कर आकारणीबाबत नागरिकांकडून तक्रारी प्राप्त होत आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिकेत महापौर नागपुरे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये गावातील कर आकारणीबाबत सविस्तर चर्चा झाली. त्यानंतर या गावांतील प्रतिनिधींचा समावेश असलेल्या समितीची स्थापन करण्यात येईल, असे महापौर नागपुरे यांनी जाहीर केले.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे महापालिकेतील गटनेते काका चव्हाण, नगरसेवक सुभाष नानेकर, अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी, मिळकतकर विभागाचे प्रमुख रवी पवार यांच्यासह इतर अधिकारी या वेळी उपस्थित होते.



### तोडगा शोधण्यासाठी समिती

» पुणे महापालिकेत समाविष्ट झालेल्या गावांमधील मिळकतकर वसुलीचा प्रश्न गंभीर बनला आहे. राज्य सरकारच्या स्थितीमुळे कर वसुलीत अडथळे येत असून महापालिकेचे उत्पन्न कमी होत आहे. दुसरीकडे नागरिकांनी वाढत्या कर आकारणीवर आक्षेप घेतला आहे. या पार्श्वभूमीवर महापौर मंजूषा नागपुरे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन संबंधित गावांतील प्रतिनिधींची समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या समितीकडे नागरिकांनी लेखी सूचना सादर कराव्यात, त्यानंतर प्रशासनाशी चर्चा करून योग्य तोडगा काढण्यात येणार आहे.